# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १०/०३/२०२५ अनु.क्र. ४७

**(अमरावती शहर पोलीसांची २०२५ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांचीसुरक्षा.**
- **जातीयसलोखा वाढविणे.**
- **संघटितगुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## पदोन्नती

**१.पोआअ/आस्था-प्रलि/पोहवा ते सपोउपनि पदोन्नती/२४५८/२०२५अमरावती शहर दिनांक ०७/०३/२०२५**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापेनरील खालील नमुद पोलीस हवालदार (अराजपत्रीतगट-क) यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक:-बीसीसी२०१८/प्र.क.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दिनांक २५.०५.२००४ रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने खालील अटीचे अधिन राहून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (अराजपत्रीतगट-क) या पदावर वेतन संरचना वेतन स्तर एस-१०, रु.२९२००-९२३००/- मध्ये आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांका पासून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | विशेषवेतन |
|---|---|---|
| सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक | एस-१०,रु.२९२००-९२३००/- | --- |
| पोलीस हवालदार | एस-९,रु.२६४००-८३६००/- | विशेषवेतनरु.७५०/- |

| अ.क्र. | पदनाम | ब.क्र. | अंमलदाराचेनांव | जात/प्रवर्ग | पदोन्नतीदिलेलाप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा | १०१२ | प्रकाश दशरथ मेश्राम | महार/अ.जाती | ज्येष्ठते नुसार खुला |

१.उपरोक्त पोलीस अंमलदारा विरुध्द विभागीय चौकशी/प्राथमिक चौकशी सुरु असेल किंवा न्यायालयात खटला चालू असेल किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णया विरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल किवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. तसेच वरील प्रमाणे पदोन्नती दिल्या नंतर मागावून कोणतीही प्रतिकुल बाबनिदर्शनास आल्यास संबधित अंमलदारास देण्यात आलेल्या पदोन्नतीचे पदावरुन तात्काळ पदावनत करण्यात येईल. तसेच उपरोक्त अंमलदारांपैकी ज्या अंमलदारांनी मार्च २०२३ अखेरचे मत्ता व दायीत्व विवरणपत्र या कार्यालयास सादर केलेले नाहीत. अशा पोलीस अंमलदार यांनी तात्काळ मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर करावे.

२. पदोन्नत झालेल्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकांचे अभिनंदन व शुभेच्छा.

**२.पोआअ/आस्था-प्रलि/पोशि ते पोहवा पदोन्नती/२४५७/२०२५अमरावती शहर दिनांक ०७/०३/२०२५**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापेनरील खालील नमुद पोलीस शिपाई (अराजपत्रीतगट-क) यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक :- बीसीसी २०१८/प्र.क.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दिनांक २५.०५.२००४ रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने खालील अटीचे अधिन राहून पोलीस हवालदार (अराजपत्रीतगट-क) या पदावर वेतन संरचना वेतन स्तर एस-९, रु.२६४००-८३६००/- अधिक विशेष वेतन रु.७५०/- मध्ये आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांका पासून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | विशेष वेतन |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९, रु.२६४००-८३६००/- | विशेष वेतन रु. ७५०/- |
| पोलीस शिपाई | एस-७, रु.२१७००-६९१००/- | विशेष वेतन रु. ७५०/- |

| अ.क्र. | पदनाम | ब.क्र. | पोलीस अंमलदाराचे नांव | पदोन्नती दिलेला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| ०१. | LPC | ९४९ | संगिता जितेंद्रजी डोंगरदिवे | ज्येष्ठते नुसार खुला |

१. उपरोक्त पोलीस अंमलदारा विरुध्द विभागीय चौकशी/ प्राथमिक चौकशी सुरु असेल किवा न्यायालयात खटला चालू असेल किवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल किवा ते एखादी शिक्षा भोगत असतीलतर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयासतात्काळसादर करावा. तसेच वरील प्रमाणे पदोन्नती दिल्यानंतर मागावून कोणतीही प्रतिकुल बाब निदर्शनास आल्यास संबधित अंमलदारास देण्यात आलेल्या पदोन्नतीचे पदावरुन तात्काळ पदावनत करण्यात येईल.तसेच उपरोक्त अंमलदारां पैकी ज्या अंमलदारांनी मार्च २०२३ अखेरचे मत्ता व दायीत्व विवरणपत्र या कार्यालया ससादर केलेले नाहीत.अशा पोलीस अंमलदार यांनी तात्काळ मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर करावे.

२. पदोन्नत झालेल्या पोलीस हवालदार यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## निरंक

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

# <u>संकीर्ण</u>

**१.पोआअ/प्रलि-आस्था/पोलीस भरती/२४१५ /२०२५ अमरावती शहर दिनांक ०६/०३/२०२५**

## <u>नियुक्ती आदेश</u>

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदी नुसार**"पोलीस शिपाई" (गट-क, अराजपत्रीत)** पदाची पोलीस भरती २०२२-२०२३ ची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ मध्येपोलीस शिपाई पदावर निवड झालेलेखालील नमुदउमेदवार **चारीत्र्य पडताळणी व वैद्यकिय तपासणी मध्ये** पात्रठरल्याने त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ अन्वये वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर. एस-७ :- २१७००-६९१००, अधीक विशेष वेतन रुपये ७५०/- (महागाई भत्ता व लागु असलेले इतर भत्त्यासह) मध्ये**"पोलीस शिपाई"** पदी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१, प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारा नुसार **ही निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुनपोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | चेस्ट क्रमांक | नियुक्तीचा प्रवर्ग | बक्कल क्रमांक | नियुक्ती पासुन देय वेतन | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.प्रविण प्रल्हाद लिल्हारे | २९३ | **खुला/माजी सैनिक** | ८७४ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |

**<u>अटी व शर्ती</u>** <u>:-</u>

१) उपरोक्त नमुद उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व वेळोवेळी सेवाप्रवेश नियम २०११ मध्ये झालेल्या सुधारणेच्या संपुर्णतरतुदी लागु राहतील. उमेदवारांची नियुक्तीपुर्णत:अस्थायी स्वरुपाची राहील. तसेच उमेदवारांची अर्हता व उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे पोलीस शिपाई पदावर निवडकरण्यांत आलेली आहे. त्यामुळे पोलीस भरतीच्या वेळी सादर केलेली विविध प्रमाणपत्रे, गुणपत्रिका बनावट/खोटे असल्याचे भविष्यात आढळून आल्यास तसेच कोणतीही अनर्हता आढळून आल्यास शासकीय सेवा पुर्व सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्यांत येईल. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ तरतुदीनुसार **राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नविन "परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना आता सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" लागुठरेल.** मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १९९८ लागुहोणार नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१ मार्च २०२३ तरतुदीनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन

योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन  प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांनाकुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या  कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृति उपदानतसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील.

३)  पूर्व चारित्र व वर्तणुक पडताळणी बाबत भरुन दिलेला साक्षांकन फॉर्म मध्येखोटी माहिती पुरविलेली आहे किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे सेवाकाळात कधीही निदर्शनास आल्यास तसेच आपले विरुध्द फौजदारी खटले न्याय प्रविष्ठ आहेत किंवा नैतीक अंध:पतनाच्या गुन्हयात आपणास दोषी ठरवुन न्यायालयाने शिक्षा दिल्याचे किंवा पोलीस सेवेत अभियोग्य नसल्याचे आढळुन आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल व आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४)  तुम्हास देण्यात आलेली नियुक्तीही निव्वळ तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाची असुन तुम्हास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अथवा नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

५)  पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परिक्षा चार संधी मध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधी मध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाहीतर आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधीत परिक्षा विहीत संधित उत्तीर्ण झाल्यास, राखुन ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखुन धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

६)  प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे होईल याची दक्षता बाळगावी. प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन किंवा असभ्य वर्तन आढळुन आल्यास त्वरीत सेवेतुन कमी करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधी मध्ये कोणत्याही प्रकारच्या रजा मिळणार नाही तसेच सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय मुख्यालय परिसर सोडुन बाहेर जाता येणार नाही.

७)  हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधीच्या नियमावलीनुसार जर त्यांनी या परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील किंवा त्या उत्तीर्ण होण्यापासुन त्यांना सुट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी विषयांची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्णहोणे आवश्यक राहील. अन्यथा तद्नंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखुन ठेवण्यात येईल.

८)  शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५ चे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ तरतुदीनुसार आपणास दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्या नंतर हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत नमुना-अ नुसार विहीत प्रतिज्ञापन भरुन दयावे लागेल तसेच हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळुन आल्यास राज्य शासकिय सेवेच्या पदासाठी अनर्ह ठरविण्या००त येवुन सेवेतुन कमी करण्यात येईल.

९)  गृह विभाग शासन पत्र क्र. पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि-भरती/प्रशि-खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २३.०४.२०१२ अन्वये पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्या नंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील

नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारा कडुन प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसुल करण्यात येईल. प्रशिक्षणावरचा खर्च म्हणुन प्रती महिना रु. २०००/- (प्रती मासीक दोनहजार फक्त) इतका प्रशिक्षणा वरील खर्च वसुल करण्यात येईल. तसेच शासकिय सेवेचा राजीनामा स्विकारण्याच्या संबंधात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२ डिंसेबर १९९७ मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचने प्रमाणे तरतुदी बंधनकारक राहतील.

११) पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातुन इतर पोलीस घटकात बदलीसाठी गृहविभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब दिनांक २६ ऑक्टोंबर २०१७ मधीलतरतुदी लागु राहतील.

१२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्या नंतर, अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समिती कडुन करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समिती कडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची छायाकिंत प्रत या कार्यालयात सादर करावी. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर आपणांस दिलेली नियुक्ती त्वरीत रद्दकरण्यात येईल आणि आपले विरुध्द महाराष्ट्र अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

१३) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागुहोतील.

१४) पोलीस शिपाई पदावर नियुक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ अन्वये निश्चीतकरण्यात येईल.

१५) शासकिय सेवेत रुजु झाल्यानंतर उमेदवारास भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

१६) आपणांस नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करतांना पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथील नियुक्ती आदेशात नमुद करण्यात आलेल्या बक्कल क्रमांकाचा उल्लेख व वापर करण्यात यावा.

१७) आदेश प्राप्त होताच आपण राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे तात्काळ हजर व्हावे. यापुर्वी कोणत्याही सेवेत नोकरीकरीत असल्यास नोकरी सोडण्यासाठी करावयाच्या कार्यवाही करीता पुरेसा अवधी म्हणुन १० दिवस कालावधी देण्यात येईल. सदरचा विहीत मुदतीचा कालावधी संपल्या नंतर आपणांस पोलीस शिपाई पदावर रुजु करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१८) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासासाठी प्रवास भत्ता मिळणार नाही.

**(गणेश शिंदे)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस